## नियमित दिवाणी दावा क्रमांक ६९/२०१५ मधील निशाणी १२४ चे अर्जावरील आदेश

(नसीर महंमद इनामदार वगैरे विरुध्द दि. यशवंत नागरी सह. बँक लि, फलटण वगैरे इतर)

---

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दुय्यम पुरावा वाचणेस परवानगी मिळावी म्हणून दाखल केलेला आहे. वादींनी निशाणी क्रमांक १२६ ला लेखी म्हणणे दाखल केले व आक्षेप घेतला आहे.

०२. प्रतिवादीं यांचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी यांच्या मार्फत दाखल केलेल्या कागद यादी नि.क्र.४३ वरील अनुक्रमांक १२ या कागदपत्राची मुळ प्रत प्रतिवादी बँकेकडून गहाळ झालेली आहे. त्याबाबत नगर पंचायत, पाटण यांचेकडे मागणी केली असता, सदर प्रत आढळून येत नाही, असे लिखीत स्वरुपात म्हणणे दिलेले आहे. करिता नि.क्र.४३ लगत अनुक्रमांक १२ हा कागद दाखल करीत असताना तो मुळ प्रती वरुन सहाय्यक अधिक्षक यांनी साक्षांकीत प्रत केलेली आहे. त्यामुळे नि.क्र.४३ वरील अनुक्रमांक १२ हा कागद सदर कामामध्ये दुय्यम पुरावा म्हणून वाचण्यास परवानगी मिळावी म्हणून विनंती केली.

०३. वादींचे थोडक्यात कथन असे की, प्रतिवादी यांचा अर्ज व त्यातील नमूद मजकुर आणि केलेली मागणी, तसेच, सोबत दिलेले प्रतिज्ञापत्र व त्यातील संपूर्ण मजकूर खोटा असल्याचे कथन करुन तो त्यांना मान्य नसल्याचे सांगितले आहे. नि.क्र.४३ वरील अ. नं. १२ वरील कागद हा तथाकथित विषय ६ व ठराव क्रमांक ६/२ ही ग्रामपंचायत पाटण यांनी बनवलेली खोटी ठरावाची नक्कल दाखवलेली आहे. ती नक्कल खोटी व बनावट असून तसा ठराव ग्रामपंचायत, पाटण यांच्याकडे तपासणीत दिनांक २७.१०.१९९४ रोजी झालेला नाही. सदरचा कागद हा छायांकीत प्रतने दाखवला असून ती साक्षांकीत प्रत नाही. त्यामुळे सदरील प्रकरणात दुय्यम दर्जाचा पुरावा देत येत नाही. दुय्यम दर्जाचा पुरावा देणेसाठी प्रथम दर्जाची प्रत असणे गरजेचे असते. तशी प्रत कधीही प्रथम दर्जाची नव्हती व नाही. त्यामुळे सदरील अर्ज फेटाळणेची मागणी केलेली आहे.

०४. प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. अ. प्र. मारुलकर यांनी असा युक्तिवाद केला की, भारतीय पुरावा अधिनियमचे कलम ६३ यामधील इल्यूस्ट्रेशन (क) नुसार दुय्यम पुरावा म्हणून नि.क्र.४३ वरील अ. नं. १२ वर असलेला कागद यास वाचता येईल. तो दस्तऐवज गहाळ झाल्याचे लिखीत स्वरुपामध्ये नगर पंचायत पाटणने लिहून दिलेला

आहे. त्याकरीता प्रतिवादींचा अर्ज मंजूर व्हावा, असा युक्तिवाद केला.

०५. वादींतर्फे विधीज्ञ श्री. ए. आर. जानुगडे यांनी युक्तिवाद केला की, सदर दस्तऐवज प्रतिवादी बँकेच्या ताब्यात आहे. भारतीय पुरावा अधिनियमचे कलम ६५ (अ)(ब)(क)(ड) या कलमांमध्ये बसत नाही. त्यामुळे सदर दस्तऐवजाला दुय्यम पुरावा म्हणून मानता येणार नाही. सदर दस्तऐवज अस्तित्वात होता व गहाळ झाला, याबाबतचा मुख्य तथ्य व फाउंडेशनल फॅक्टस् प्रतिवादींनी दाखवले नाहीत. त्याकरीता प्रतिवादींचा अर्ज फेटाळणेत यावा, असा युक्तिवाद केला.

वादी यांनी खालील केस लॉ दाखल केला आहे.

०६. माननीय सर्वोच्च न्यायालय यांचे न्यायनिवाडा *U. Sree Vrs. U. Srinivas, 2013 AIR (SC) 415* हा केस लॉ दाखल केला आहे. सदर केस लॉ नुसार "Recently, in H. Siddiqui (Dead) by Lrs. V. A. Ramalingam, (2011) 4 SCC 240, while dealing with Section 65 of the Evidence Act, this Court opined though the said provision permits the parties to adduce secondary evidence, yet such a course is subject to a large number of limitations. In a case where the original documents are not produced at any time, nor has any factual foundation been laid for giving secondary evidence, it is not permissible for the court to allow a party to adduce secondary evidence. Thus, secondary evidence relating to the contents of a document is inadmissible, until the non-production of the original is accounted for, so as to bring it within one or other of the cases provided for in the section. The secondary evidence must be authenticated by foundational evidence that the alleged copy is in fact a true copy of the original. It has been further held that mere admission of a document in evidence does not amount to its proof. Therefore, it is the obligation of the Court to decide the question of admissibility of a document in secondary evidence before making endorsement thereon."

०७. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादींनी नि.क्र.४३ लगत अ.क्र. १२ वरील दस्तऐवज याची छायांकीत प्रत दाखल केल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादींनी नि.क्र.१२३ अ कागदयादी प्रमाणे पाटण, नगरपंचायत, पाटण यांचे पत्र दाखल केले आहे. सदर पत्रावरुन असे दिसून येते की, मागणी केलेला अभिलेख उपलब्ध दिसून येत नाही, असे पत्रामध्ये नमूद केले आहे. सदर पत्रावरुन असे दिसून येते की, प्रतिवादीं मागणी करत असलेला दस्तऐवज हा अस्तित्वात होता व तो उपलब्ध नसल्याचे दुय्यम

पुराव्याकरीता लागणारे मुख्य तथ्ये प्रतिवादींनी दाखवून दिलेले आहेत. वादींनी दाखल केलेला वर नमूद केस लॉ मधील गृहितके सदर प्रकरणाला लागू होत असल्याचे दिसून येते. सदर दस्तऐवज याला दुय्यम पुरावा म्हणून दाखल करुन घेणे न्यायोचित होईल. सदर दस्तऐवज सिध्द करुन घेण्याची जबाबदारी प्रतिवादींची राहिल. सदरचा दावा गुणावगुणावर चालविण्यासाठी प्रतिवादींना सदर दस्ताबाबत दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देणे न्यायोचित होईल. तसेच, वादींना उलटतपास घेण्याची संधी मिळणार आहे. सदर अर्ज मंजुर केल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी, दावा गुणावगुणावर चालविण्यास मदतच होईल. त्याकरिता खालीलप्रमाणे आदेश –

## आदेश

१. प्रतिवादींचा अर्ज (निशाणी १२४) मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादींना नि.क्र. ४३ लगत अ.क्र.१२ वरील दस्तऐवजाचा दुय्यम पुरावा देण्यास परवानगी देण्यात येते.

३. सदर पुरावा प्रतिवादींना भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ चे तरतुदीनुसार सिध्द करावा लागेल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Chetna Yashwant Neware
Date: 2023.07.07 11:19:46 +0530

दिनांकः ०३.०७.२०२३. (सी.वाय.नेवारे)

ठिकाण – पाटण, जिल्हा सातारा. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटण.